नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/08/2023 (मंगळवार) दुपार

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक २१/०८/२०२३ रोजी पोलीस स्टेशन मौदा परीसरात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असता मुखबीरद्वारे खबर मिळाली की १० चक्का ट्रक क्र. MH–४०/N–७५९२ या वाहनाने काही इसम बेकायदेशीरपणे गोवंश यांना त्यांची चारा पाण्याची सोय न करता गाडी मध्ये कोंबून कत्तलीकरीता वडोदा शिवारातील मुरली ॲग्रो कंपनीच्या मागून घेऊन जात आहे. यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मौजा वडोदा शिवारातील मुरली ॲग्रो कंपनीच्या मागे रोडवर नाकाबंदी करून ट्रक क्र. MH–४०/N–७५९२ त्यास थांबविण्याचा इशारा केला असता पोलिसांना गणवेशात पाहुन ट्रकच्या चालक व मालक हे अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरून पळून गेले. घटनास्थळी ट्रक मध्ये एकूण १४ गोवंश किंमती १ लाख ७६ हजार रु. जनावरे क्रूरतेने कोंबून बांधुन क्लेशपणे वागणूक देवून त्यांची कोणत्याही प्रकारची चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करतांना मिळुन आले. १० चक्का ट्रक क्र. MH–४०/N–७५९२ किंमती १५ लाख रु. वाहनासह असा एकुण किंमती एकूण १६ लाख ७६ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर जप्ती मुद्देमाल व फरार चालक व मालक यांचे विरुद्ध कलम ११(१) ड प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा ५ (१) (A) महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करणेकामी पो.स्टे. मौदा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. विशाल आनंद (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक अनील राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राऊत, ईकबाल शेख, पोलीस नायक संजय बरोदीया, प्रमोद भोयर, वीरेंद्र नरड, चालक मोनू शुक्ला यांनी पार पाडली.





## घरफोडी

**१) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत मस्के लेआउट वार्ड ७ वाघोडा येथे दि. २०/०८/२०२३ ते दि. २१/०८/२०२३ चे २१/३० वा. ते ४/१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— राजेंद्र गोविंदा राउत, वय ५३ वर्ष, रा. मस्के लेआउट वार्ड ७ वाघोडा याचे भावाने फिर्यादीला फोन करून सांगितले की, काल रात्री ९/३० वा. पाहीले तेव्हा घराचा मागील दरवाजा लॉक करून व्यवस्थित लावला होता व सकाळी उठून पाहीले तेव्हा फिर्यादीच्या घराचा मागील दरवाजा उघडलेला दिसला व लॉक लावलेला दिसत नसून घरातील लोखंडी आलमारीत लॉकर उघडे दिसत असून सामान अस्ताव्यस्त फेकलेले दिसत असून फिर्यादीचे घरी चोरी झाली आहे. असे सांगितल्याने फिर्यादी नागपूर वरून घरी वाघोडा येथे आला. तेव्हा घराचा मागील खोलीचा दरवाजा उघडलेला व त्याचा लॉक दिसला नाही तसेच लोखंडी आलमारीत ठेवलेले १) सोन्याची नाकातील फिरकी किंमती ४०००/— रू. २) ३ जोड पायपट्टी किंमती ९००/— रू ३) सोन्याचे मणी १ ग्रॅम, किंमती २०००/—.रू, ४) चांदीचे गोप व त्यामध्ये सोन्याचा लॉकेट किंमती २०००/—रू. व ५) नगदी ६०,०००/— रू. असा एकुण ६८,९००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार संजय शिंदे ब. नं. ११६१ पो.स्टे. सावनेर मो. नं. ९८२२९३२२५३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. वेलतूर** :— अंतर्गत १० किमी अंतरावर फेगड येथे दि. १०/०८/२०२३ चे ११.०० वा. ते दिनांक १९/०८/२०२३ चे ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. किरण देविदास नान्हे, वय ३१ वर्ष, रा. फेगड ता. कुही जि. नागपुर हे अपघाता दरम्यान जखमी झाल्याने त्यास उपचारा करिता नागपुर, भंडारा येथील हॉस्पीटल मध्ये उपचार घेवुन घरी परत येवुन पाहीले असता घराचे समोरील दरवाजाचे कडी कोंडा तुटलेला असुन घरातील लोखंडी अलमारी मधील सोन्या/चांदीचे दागीने १) ३ ग्रॅम सोन्याचे कानातील डोरले किंमती ९०००/—रू. २) ८.५ ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र किंमती २५५००/— रू ३) १.५ ग्रॅम सोन्याचे कानातील घडा किंमती ४५००/— रू ४) चांदीचे हातातील ४ जोड कडे किंमती २०००/— रू ५) चांदीचे पायपट्टया ३ जोड किंमती ३०००/— रू ६) नगदी ५०००/— रू असा एकुण ४९०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपी याने दिवसा किंवा रात्र चोरी करून घेवुन गेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक मनिराम भुरे पो. स्टे. वेलतुर मो. क्र. ९२८४१२२९०५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**